Pune District Education Association's
SHANKARRAO URSAL COLLEGE OF PHARMACY (DIPLOMA)
KHARADI, PUNE-14.

Date: - 27/08/2022

# NOTICE NO. - 31
## (Academic Year 2022-23)

All the students of S.Y. Diploma in Pharmacy of academic year 2021-22 are hereby informed that, as per attached circular of MSBTE regarding special provision for filling examination form for Re-examination for those students who failed in Summer 2022 exam, they can fill exam forms of Re-examination in between 05/09/2022 to 07/09/2022.

**Note: -1. No students will be allowed to fill the exam forms after this Scheduled date.**
**2. No Excuse will be entertained after this schedule.**

(Ms. Shweta Pawar)
Exam Incharge
Exam in Charge
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College of
Pharmacy (Diploma),
Kharadi, Pune 411014.

(Dr. Sachin Kotwal)
Principal
PRINCIPAL
Pune District Education Association's
Shankarrao Ursal College Of Pharmacy
(Diploma) Kharadi, Pune 411 014.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दू.क्र.: ०२२-६२५४२११०/ १८८
संकेतस्थळ : www.msbte.org.in
ई-मेल : secretary@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/वि.स./उ.प.२२/२०२२/ १७८

दिनांक : 25 AUG 2022

## महत्वाचे परिपत्रक

प्रति,

प्राचार्य,

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित संस्था.

**विषय: उन्हाळी परीक्षा २०२२ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण मान्यताप्राप्त अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयांच्या फेरपरीक्षेबाबत.**

**संदर्भ:** माननीय मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विधानमंडळ अधिवेशनात दिनांक २४/०८/२०२२ रोजी केलेले निवेदन.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने माननीय मंत्री महोदय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विधान मंडळ अधिवेशनात दिनांक २४/०८/२०२२ रोजी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उन्हाळी २०२२ परीक्षेमध्ये अंतिम सत्र / वर्षातील अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या अनुत्तीर्ण विषयांची तसेच त्यांच्या असलेल्या उन्हाळी परीक्षा २०२२ मधील अनुत्तीर्ण बॅकलॉग विषयांची फेरपरीक्षा अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणुन मंडळाच्या प्रचलित पद्धतीने मंडळाने निर्धारीत केलेल्या परीक्षाकेंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे. त्याबाबत मंडळाशी संलग्नीत अखिल भारतीय मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्था, विद्यार्थी व त्यांचे पालक यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) **फेरपरीक्षेबाबतचे संक्षिप्त वेळापत्रक:**

| अ.क्र. | फेरपरीक्षेचा तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | परीक्षा अर्ज स्विकृती | |
| | विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरणे (Candidate fill) | ०५ ते ०७ सप्टेंबर, २०२२ |
| | विद्यार्थ्यांनी भरलेले परीक्षा अर्ज संस्थांनी निश्चित करणे. (Institute fill & Confirmation) | ०५ ते ०८ सप्टेंबर, २०२२ |
| | विभागीय कार्यालयांनी परीक्षा अर्ज निश्चित करणे. (RBTE confirmation) | ०५ ते ०९ सप्टेंबर, २०२२ |
| २ | विभागीय कार्यालयांनी परीक्षा अर्ज निश्चित करण्याचा अंतिम दिनांक | ०९ सप्टेंबर, २०२२ |
| ३ | परीक्षा ओळखपत्र व सिंटीग चार्ट प्रदर्शित करणे | १३ सप्टेंबर, २०२२ |
| ४ | प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षा | १५ ते १७ सप्टेंबर, २०२२ |
| ५ | **लेखी परीक्षा** | **२१ सप्टेंबर ते ०४ऑक्टोबर, २०२२** |

Follow the schedule. Inform students SVP 25/08/22

P.D.E.A.'s S. B. College of E (Diploma) Kharadi
INWARD NO : 154
DATE : 25/8/22

२) फेरपरीक्षेबाबत **महत्वाच्या सुचना :**

i. ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा २०२२ करीता अंतिम सत्र / वर्षांतील तसेच त्यांचे असलेले बॅकलॉग विषयांचा परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयामार्फत निश्चित केला होता, तसेच **उन्हाळी परीक्षा २०२२ चा निकाल Fail/WFLS/WFLY असा असेल अशाच विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण** विषयांकरीताच **फेरपरीक्षेची संधी देण्यात येणार आहे.**

ii. फेरपरीक्षेच्या संधीचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी मुद्दा क्र. १ मध्ये नमूद परीक्षा अर्ज वेळापत्रकानुसार नियमित परीक्षा शुल्कासह परीक्षा अर्ज संस्थास्तरावर भरुन विभागीय कार्यालयामार्फत निश्चित करणे अनिवार्य राहील. विभागीय कार्यालयांनी परीक्षा अर्ज निश्चित केलेले विद्यार्थीच फेरपरीक्षा देण्याकरीता पात्र राहतील.

iii. नियमित उन्हाळी परीक्षा २०२२ चा अंतिम सत्र / वर्षातील Reassessment चा निकाल दि. ०७ सप्टेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात येणार आहे. सदर निकाल जाहीर झाल्यानंतर फेरपरीक्षेकरीता परीक्षा अर्ज भरलेले विद्यार्थी ज्या विषयात उत्तीर्ण होतील अशा विषयांची फेरपरीक्षा घेण्यात येणार नाही, तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या फेरपरीक्षा Hall Ticket मधुन उत्तीर्ण झालेले विषय वगळण्यात येतील.

iv. दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता मंडळाच्या परीक्षाविषयक नियमावलीतील RG-१०(G) नुसार सोयीसुविधा देण्यात येतील. संस्थामार्फत अशा दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात.

v. उन्हाळी परीक्षा २०२२ दरम्यान गैरप्रकार प्रकरणी शिक्षा झालेले अंतिम सत्र / वर्षातील विद्यार्थी सदर फेरपरीक्षेकरीता पात्र असणार नाहीत.

vi. सर्व संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घ्यावी. परीक्षेदरम्यान गैरवर्तन झाल्यास मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG-१२ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. याबाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थी, अध्यापक व इतर कर्मचारी यांना अवगत करावे.

vii. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे प्रथम सत्र १७ ऑगस्ट, २०२२ पासुन सुरु झालेले असुन हिवाळी २०२२ ही परीक्षासुद्धा माहे डिसेंबर, २०२२ मध्ये घेण्याबाबत मंडळाच्या शैक्षणिक वेळापत्रकान्वये घोषीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर शैक्षणिक कामकाज सुरळीत सुरु ठेवणे सुद्धा गरजेचे असल्याने सदर फेरपरीक्षेच्या निकालानंतर गुणपडताळणी, फोटोकॉपी व पुनर्गुणमुल्यांकनाची सुविधा देण्यात येणार नाही.

**३) अंतिम सत्र / वर्षाकरीता अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुत्तीर्ण विषयांचे आकलन सुयोग्यप्रकारे होण्याच्या दृष्टीने अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता विषयनिहाय अतिरीक्त अध्यापन वर्ग संस्थास्तरावर आयोजित करावे. सदर वर्गास विद्यार्थ्यांची उपस्थिती राहण्याकरीता संबंधित अध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे. मंडळामार्फत निर्धारित केलेल्या फेरपरीक्षा आयोजनापुर्वी संस्थास्तरावर अशा विद्यार्थ्यांकरीता सराव परीक्षा आयोजित करावी. या अनुषंगाने करावयाच्या सविस्तर** कार्यवाहीबाबत **मंडळाच्या दि. २४.०८.२०२२ च्या महत्वाचे** परिपत्रकान्वये **सर्व संस्थांना निर्देशित करण्यात आलेले आहे.**

तरी संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना सुचित करण्यात येते की, वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करुन द्याव्यात, तसेच विद्यार्थ्यांना फेरपरीक्षेबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे. फेरपरीक्षा मंडळाच्या नियमावलीप्रमाणे सुरळीतपणे पार पाडण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या प्राचार्यांची राहील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत माहितीस्तव-**

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

**प्रत माहिती व आवश्यक** कार्यवाहीकरीता -

१) प्राचार्य, पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या स्वायत्त संस्था.

२) उपसचिव, म.रा.तं.शि.मं. विभागीय कार्यालय मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.